नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि.०९/१०/२०२६

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
तहकूब सभा परिपत्रक क्र.१

महिला व बालकल्याण समितीची सभा (मंगळवार दि.२९/०९/२०२६ रोजी तहकूब केलेली) मंगळवार,दि.१३/१०/२०२६ रोजी दुपारी ३:३० (तीन वाजून तीस मिनिटे) वाजता समिती सभागृह, नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१०, दि. ९/९/२०२६ वरील विषय क्र. १२७ ते विषय क्र.१३३ चा विचार होईल.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
तहकूब सभा परिपत्रक क्र.२

महिला व बालकल्याण समितीची सभा (मंगळवार दि.२९/०९/२०२६ रोजी तहकूब केलेली) मंगळवार,दि.१३/१०/२०२६ रोजी दुपारी ३:३५ (तीन वाजून पस्तीस मिनिटे) वाजता समिती सभागृह, नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्र.११, दि. २९/९/२०२६ वरील विषय क्र. १३४ ते विषय क्र.१४३ चा विचार होईल.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्र. १२

महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार,दि.१३/१०/२०२६ रोजी दुपारी ३:४० (तीन वाजून चाळीस मिनिटे) वाजता समिती सभागृह, नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १४४

मा. सौ.अश्विनी डॅनियल लांडगे व मा. रफिकभाई शेख यांचे दि.२९/०९/२०२६ रोजीचे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध योजनांच्या माध्यमातून गरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना अनुदान देण्यात येते. मात्र, गेल्या अनेक वर्षापासून या अनुदानाच्या रकमेत पुरेशी वाढ झालेली नाही. दरम्यानच्या काळात अन्नधान्य, औषधे, शिक्षण, घरभाडे, वीज व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे पूर्वी निश्चित केलेली अनुदानाची रक्कम आजच्या महागाईच्या तुलनेत अत्यंत अपुरी ठरत आहे.

महागाई सातत्याने वाढत असताना अनुदान मात्र वर्षानुवर्षे त्याच रकमेत राहणे हे गरजू लाभार्थ्यांच्या हिताचे नाही. त्यामुळे समाज विकास विभागाच्या सर्व अनुदान योजनांचा तातडीने आढावा घेऊन सध्याच्या महागाईचा विचार करता अनुदानाच्या रकमेत भरीव वाढ करण्यात यावी.

तसेच, भविष्यात महागाईनुसार अनुदानाची रक्कम वेळोवेळी सुधारित करण्यासाठी दर २-३ वर्षांनी अनुदानाचे पुनरावलोकन करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी व आगामी अर्थसंकल्पात त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी. तरी, पुणे शहरातील गरीब व गरजू नागरिकांच्या हिताचा गांभीर्याने विचार करून अनुदानाच्या रकमेत तातडीने भरीव वाढ करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

मा.महा.आयुक्त यांच्या कडून आलेले पत्र

विषय क्र. १४५

पुणे महानगरपालिकेमार्फत अल्प उत्पन्न गटातील पात्र गर्भवती व स्तनदा मातांसाठी पौष्टीक आहार (बाळंतविडा) योजना" सुरु करण्याबाबत मा.सौ.अल्पना गणेश वरपे व मा.सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.०४/०८/२०२६ रोजीच्या पत्रावर झालेला मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १११,दि.०४/०८/२०२६ ला अनुसरून मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/६३१,दि.२१/०९/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

योगिता भोसले
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका